# जाहिरात

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

## सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती

ग्राम विकास विभाग, मुंबई येथील कार्यालयात केंद्रीय वित्त आयोगाशी संबंधित राज्य/केंद्र शासनाचे विविध विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी समन्वय ठेवणे, वित्त आयोगाशी सबंधित लेखा विषयक कामकाज, निधी वितरण करणे, खर्चाचा आढावा घेणे, स्थानिक स्वराज्य संस्थाचे आराखडे साईटवर टाकण्याबाबत पाठपुरावा करणे , जमाखर्च, उत्पन्न, लोकसंख्या, क्षेत्रफळ इत्यादी संबंधित विविध अहवाल एकत्रित करुन राज्य वित्त आयोग व केंद्रीय वित्त आयोगास वेळोवेळी सादर करणे, तसेच मंत्रालयीन कामकाजाचा अनुभव असलेल्या महाराष्ट्र वित्त व लेखा (गट-ब) (राजपत्रित) संवर्गातील सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती १ वर्षासाठी करावयाची आहे. यासंबंधी सविस्तर जाहिरातीचा मजकूर ग्रामविकास विभागाच्या संकेतस्थळ https://www.rdd.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी वेबसाईटवरील माहिती पाहून दिनांक ०८ डिसेंबर, २०२४ पर्यंत अर्ज सादर करावा.

पुरव

( शि. जि. पुरव )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.
ग्रामविकास विभाग.

# शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती

## ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई येथे महाराष्ट्र वित्त व लेखा (गट-ब) (राजपत्रित) संवर्गातील सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

क्रमांक:संकीर्ण-२५२४/प्र.क्र.३३१/आस्था-१, दिनांक :- ०२ डिसेंबर, २०२४.

**कार्यालयाची आवश्यकता :-**

ग्राम विकास विभाग, मुंबई येथील कार्यालयात केंद्रीय वित्त आयोगाशी संबंधित राज्य/केंद्र शासनाचे विविध विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी समन्वय ठेवणे, वित्त आयोगाशी सबंधित लेखा विषयक कामकाज, निधी वितरण करणे, खर्चाचा आढावा घेणे, स्थानिक स्वराज्य संस्थाचे आराखडे साईटवर टाकण्याबाबत पाठपुरावा करणे , जमाखर्च, उत्पन्न, लोकसंख्या, क्षेत्रफळ इत्यादी संबंधित विविध अहवाल एकत्रित करुन राज्य वित्त आयोग व केंद्रीय वित्त आयोगास वेळोवेळी सादर करणे, तसेच मंत्रालयीन कामकाजाचा अनुभव असलेल्या महाराष्ट्र वित्त व लेखा (गट-ब) (राजपत्रित) संवर्गातील सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पद संख्या |
|---|---|---|---|
| १. | लेखा अधिकारी | १. उमेदवार महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र वित्त व लेखा (गट-ब) (राजपत्रित) लेखा अधिकारी संवर्गातील पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.<br>२. उमेदवारास मंत्रालयीन कामकाज, अर्थसंकल्पीय बाबींचे तसेच Audit / Account / Tax Deduction या कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.<br>३. उमेदवाराचे वय दि.०१.१२.२०२४ रोजी ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.<br>४. उमेदवाराविरुद्ध शासन सेवेत असताना कोणतीही शिस्तभंगविषयक कारवाई झालेली नसावी अथवा प्रलंबित नसावी.<br>५. नियुक्तीच्या कालावधीत सोपविलेले विवक्षित काम पुर्ण करण्याचे हमी पत्र उमेदवाराला देणे बंधनकारक आहे. | १ |

कामाचे स्वरुप-:

(१) केंद्रीय वित्त आयोगाशी संबंधित राज्य/केंद्र शासनाचे विविध विभाग यांच्याशी समन्वय ठेवणे.

२) १५ व्या व १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाशी सबंधित विविध बाबींच्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी समन्वय ठेवणे, वित्त आयोगाशी सबंधित लेखा विषयक कामकाज , निधी वितरण करणे, खर्चाचा आढावा घेणे इत्यादी कामकाज पार पाडणे.

३) स्थानिक स्वराज्य संस्थाचे विकास आराखडे ई ग्रामस्वराज्य पोर्टलवर अपलोड करण्याबाबत संबंधितांकडे पाठपुरावा करणे ,

४) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विविध योजना व विकास कामावरील जमाखर्च, स्व:उत्पन्न, लोकसंख्या, क्षेत्रफळ इत्यादी संबंधित विविध अहवाल एकत्रित करुन राज्य वित्त आयोग व केंद्रीय वित्त आयोगास वेळोवेळी सादर करणे.

५) मंत्रालयीन वित्त व नियोजन विभागातील अर्थसंकल्पीय, सेवाविषयक कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६) वित्त आयोगाचे निधीचे मागणीपत्र पंचायत राज मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करणे. यासाठी सर्व ग्रामीण ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आवश्यक असलेली माहिती संकलित करण्याबाबत पाठपुरावा करणे.

७) वित्त आयोगाचा स्थानिक स्वराज संस्थांना वितरित केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकडून संकलित करुन वित्त मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करणे.

८) ५ व्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने सबंधित कार्यालयाकडून अनुपालन अहवाल प्राप्त करुन घेवून वित्त आयोग कक्ष, मंत्रालय यांना सादर करणे.

९) केंद्रीय वित्त आयोग तसेच राज्य वित्त आयोगाशी संबंधित तातडीच्या बाबी व वरिष्ठांकडून वेळोवेळी सोपविलेले विविध कामे पार पाडणे आवश्यक आहे.

नियुक्तीच्या अटी व शर्ती-:

१२) सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२७१५ / प्र.क्र.१०० / १३, दिनांक १७.१२.२०१६ व शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२७१५ / प्र.क्र.१००/१३, दि.०८.०१.२०१९ मधील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

१३) उपरोक्त पद हे शासन सेवेतील नियमित पद नाही.

१४) या पदावरील भरती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील व सुरुवातीला १ वर्षाचा कामावधीसाठी मर्यादित राहील. तथापि, आवश्यकता भासल्यास नियुक्तीस मुदतवाढ देण्याबाबत विचार केला जाईल.

१५) सदर पद करार पध्दतीने भरण्यात येईल. उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या स्थायी पदासाठी दावा करता येणार नाही अथवा हा अनुभव ग्राह्य असणार नाही.

१६) या पदावर निवड झालेल्या उमेदवारास शासन सेवेत नियमित करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.

१७) उमेदवाराचे कामकाज कोणत्याही वेळी असमाधानकारक आढळल्यास एक महिन्याची पूर्व सूचना देऊन सेवा समाप्त करण्यात येतील.

१८) सदर पदासाठी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट (ब) (राजपत्रित) संवर्गातील सेवानिवृत्त शासकीय अधिकारी अर्ज करण्यात पात्र असतील. त्यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक-संकीर्ण-२७१५/प्र.क्र. (भाग-१)/१३ , दिनांक ०८ सप्टेंबर, २०२३ मधील तरतूदीनुसार परिश्रामिक देय राहील.

१९) ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाचे आत (म्हणजे दिनांक ८.१२.२०२४ पर्यंत ) उमेदवारी अर्ज सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२०) उमेदवाराने आपला अर्ज सोबतच्या नमुन्यामध्ये शासकीय कामाचा अनुभव इत्यादी तपशीलासह प्रधान सचिव (ग्रामविकास व पंचायत राज) यांच्या नावे वरील पत्तावर विहित मुदतीत प्राप्त होईल अशा बेताने पाठवावा.

२१) अर्ज प्राप्त होणाऱ्या इच्छुक उमेदवारांमधून मुलाखतीव्दारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे.

२२) करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीत करावयाच्या कामाचे निश्चित स्वरुप जाणून घेण्यासाठी आवश्यकता असल्यास उमेदवाराने श्रीम.शि.जि.पुरव, कार्यासन अधिकारी यांच्याशी शासनाच्या कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक ०२२ - २२७९३२३७ वर संपर्क साधावा.

पुरव

( शि. जि. पुरव )

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

# अर्जाचा नमुना

प्रति,

प्रधान सचिव (ग्रामविकास)
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन, फोर्ट,
मुंबई-४०० ००१.

छायाचित्र

विषय :- लेखा अधिकारी या पदाकरीता करार पध्दतीने नियुक्ती मिळण्याबाबत अर्ज.

संदर्भ - आपल्या विभागाची जाहिरात क्र. दि.

उमेदवाराचे नाव : श्री/ श्रीम.................................................

सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम

व कार्यालयाचा पत्ता :

घरचा पत्ता :

संपर्क क्र. :

ईमेल- :

जन्मतारिख :

वय :

जात :

शिक्षण :

अनुभव :

(यामध्ये सेवा कालावधीत काम केलेली ठिकाणे, कामाचे स्वरुप, कालावधी आवश्यक कागदपत्रासह नमुद करावा)

स्थळ :

(उमेदवाराची स्वाक्षरी व नाव)

दिनांक :